**MMRDA signs MoU with the Government of Netherlands through Joint Declaration on Sustainable Urban Development**

**This progressive accomplishment will make the MMR excel at enforcing integrated waste management, climate resilience, and circular economy.**

**Davos, 17th January 2024:**

MMRDA has signed an MoU with the Ministry of Infrastructure and Water Management, Government of Netherlands to enforce sustainable urban development in the MMR at the World Economic Forum, Davos 2024. This is a promising step for MMRDA directed towards achieving its dream of sustainable urban development in and around the MMR through the unparalleled guidance of the Hon'ble Chief Minister of Maharashtra, Urban Development Minister & Chairman of MMRDA Shri Eknath Shinde and the relentless efforts of Hon'ble Metropolitan Commissioner of MMRDA Dr Sanjay Mukherjee, IAS. The joint declaration ensures a five-year partnership that will allow the Dutch expertise and financial contributions to transform the MMR in terms of integrated waste management, climate resilience and circular economy. In other words, the MMR will become an epitome of effective waste management, in addition to building resilience to climate change through innovative practices in infrastructure development.

The knowledge-sharing goals of the MoU illuminate the pathway for MMRDA's collaboration with potential and active Dutch companies, namely Sustainable Business Development (SusBDe), Harvest Waste B.V. (Including 9 to 10 companies in the consortia of Harvest Waste), Technimex, Hydraloop, and Deerns (Healthcare). Moreover, other Dutch companies involved in landfill gas extraction, such as Afvalzorg, Multriwell, Hofstetter, Indaver, and Enwell, will also majorly contribute to the objectives of knowledge sharing. Blue Phoenix Group, Royal Haskoning DHV, Rebel Group, BrEAD B.V., and Metasus are Dutch companies associated with Water Processing that will also support the cause. Finally, Water Purification companies like Paques, Nijhuis Industries, Econvert Water & Energy, Colsen, and Colubris Cleantech will share their expertise to support the MMR's sustainable urban development of the MMR. Thus, the extended exposure to the technological brilliance and voluminous knowledge resources of these Dutch companies under the guidance of the Netherlands' Ministry of Economic Affairs and Climate Policy is promised to the MMR through the signing of this MoU.

MMRDA is implementing environmentally conscious projects that will reshape urban infrastructure by mitigating the adverse effects of climate change, air pollution, emission of greenhouse gases, etc. Thus, this Joint Declaration was envisioned to promote cooperation between MMRDA and the Government of the Netherlands in relation to guiding the sustainable

development of the MMR. The Joint Declaration entails the sharing of best practices in smart city master planning, as well as integrated waste management. Moreover, this partnership will aid the MMR in its battle against climate change, alongside supporting its journey of attaining the Livability Goals, as well as becoming a circular economy through sustainable urban development. The mutual cooperation will benefit both sides with the exchange of information on sectoral services, opportunities, and events. Hence, the partnership between the MMRDA and the Government of the Netherlands is assured to make the gleaming future of the MMR much brighter.

Hon'ble Chief Minister of Maharashtra, Urban Development Minister, and Chairman of MMRDA Shri Eknath Shinde expressed "The Mumbai Metropolitan Region sets the benchmark for progress across Maharashtra. Hence, we firmly believe that our ability to tackle the seemingly insurmountable challenges in and around the MMR will reflect our potential to stride towards a sustainable future throughout the state. This joint declaration with the Netherlands stands as a testament to our understanding, as it will redefine our capacity to tackle a wide range of challenges that are faced in the MMR in terms of handling waste management and climate change. These progressive achievements will undoubtedly transform the MMR into a highly efficient circular economy in the near future."

Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA said **"The MMR's transformation into a sustainable metropolis is imminent, with MMRDA at the helm, guiding its noble journey every step of the way. We are deeply committed to the sustainable urban development of the MMR, and this prestigious collaboration reinforces our commitment. Embracing the global best practices in integrated waste management will be a huge leap for the MMR toward sustainability, whereas becoming a circular economy and gaining resilience to climate change will safeguard the glorious future of the MMR."**

Mr Erwin Nijsse, Director–General for Enterprise and Innovation, Ministry of Economic Affairs and Climate Policy, Government of Netherlands said **"Meaningful attempts to welcome sustainability demand collaborations between conscious entities across the globe. The environmental welfare of the world depends on such collaborations, and our joint declaration with MMRDA is a result of the perfect alignment of our ideals with MMRDA's commitment to the sustainable future of the MMR. We sincerely hope that our partnership will have a lasting impact on the MMR's environment through the enforcement of practices that complement climate resilience and sustainable urban development."**

## शाश्वत नागरी विकासासाठी एमएमआरडीए आणि नेदरलँड सरकार यांच्यात सामंजस्य करार

## एमएमआर क्षेत्रात प्रभावी एकात्मिक कचरा व्यवस्थापन, पर्यावरण पूरक आणि चक्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने उचलले महत्त्वाचे पाऊल

**दावोस, 17 जानेवारी, 2024:**

स्वित्झर्लंडमधील दावोसमध्ये सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत एमएमआरडीएने नेदरलँड सरकारच्या पायाभूत सुविधा आणि जलव्यवस्थापन खात्यासोबत एक सामंजस्य करार केला आहे. एमएमआर क्षेत्राच्या शाश्वत नागरी विकासासाठी हा करार करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आणि एमएमआरडीएचे महानगर आयुक्त, भाप्रसे, डॉ.संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली एमएमआरडीएने मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्र आणि त्याच्या आसपासच्या भागात शाश्वत नागरी विकासाचे उद्दीष्ट्य डोळ्यासमोर ठेवले असून त्या दृष्टीने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. हा करार पाच वर्षांसाठीचा असून यामुळे एमएमआर क्षेत्रात एकात्मिक कचरा व्यवस्थापन, पर्यावरण पूरक आणि चक्रीय अर्थव्यवस्थेसाठी नेदरलँडमधील तज्ज्ञ मंडळींचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच आर्थिक पाठबळही मिळणार आहे. पायाभूत सुविधांचा विकास करत असताना त्यामुळे पर्यावरणाला हानी न पोहोचवता प्रकल्प राबवण्यावर भर देण्यात येत असून प्रभावी कचरा व्यवस्थापनही राबविण्यात येणार आहे. या क्षेत्रात एमएमआर क्षेत्र एक आदर्श निर्माण करेल अशी आशा या निमित्ताने व्यक्त करण्यात आली.

या सामंजस्य करारामुळे उद्दीष्ट्ये पूर्ण करण्याच्या एमएमआरडीएच्या प्रयत्नांना नेदरलँडमधील तज्ज्ञ मंडळींच्या बौद्धिक कुशलतेची जोड मिळणे शक्य झाले आहे. सस्टेनेबल बिझनेस डेव्हलपमेंट (SusBDe), हार्वेस्ट वेस्ट बी.व्ही. (हार्वेस्ट वेस्टच्या कंसोर्टियामधील 9 ते 10 कंपन्यांसह), टेक्निमेक्स, हायड्रालूप आणि डीर्न्स (आरोग्य सेवा) या कंपन्यांचे सामंजस्य करारामुळे सहकार्य लाभणार आहे.

लँडफिल गॅस एक्स्ट्रॅक्शनसाठी अफवालझोर्ग, मल्ट्रीवेल, हॉस्टेटर, इंदावेर आणि एनवे या कंपन्याज्ञानाच्या देवाणघेवाणीच्या उद्दिष्टांसाठी मदत करतील. ब्ल्यू फिनिक्स ग्रुप, रॉयल हासकोनिंग डीएचव्ही, रेबेस ग्रुप, बीआरईएडी वी.व्ही आणि मेटासूस या जल प्रक्रियेशी संबंधित डच कंपन्या असून त्या एमएमआरडीएला या क्षेत्रासाठी सहकार्य करतील. पॅकस, निजहुईस इंडस्ट्रीज, इकॉनव्हर्ट वॉटर अँड एनर्जी, कोल्सन आणि कोलुब्रिस क्लिनटेकसारख्या जलशुद्धीकरण कंपन्या एमएमआर क्षेत्राच्या शाश्वत शहरी विकासाचे उद्दीष्ट्य पूर्ण करण्यासाठी एमएमआरडीएला कौशल्यसमृद्ध करतील. या सामंजस्य सहकार्य करारामुळे नेदरलँड्सच्या आर्थिक व्यवहार आणि हवामान धोरण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली या डच कंपन्या एमएमआरडीएला उद्दीष्ट्यप्राप्तीसाठी तांत्रिक आणि बौद्धिक कुशलतेच्या पातळीवर शक्य होतील ते सगळे प्रयत्न करतील.

एमएमआरडीए पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूक प्रकल्प राबवत आहे जे हवामान बदल, वायू प्रदूषण, हरितगृह वायूंचे उत्सर्जन इत्यादींचे प्रतिकूल परिणाम कमी करून शहरी पायाभूत सुविधांना आकार देण्यास मदत

करतील. एमएमआर क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी मार्गदर्शन प्राप्त व्हावे या उद्देशाने एमएमआरडीए आणि नेदरलँड सरकारमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. कराराच्या निमित्ताने करण्यात आलेल्या संयुक्त घोषणेमध्ये स्मार्ट सिटी मास्टर प्लॅनिंग, तसेच एकात्मिक कचरा व्यवस्थापनातील सर्वोत्तम पद्धतींचे सामायिकरणाचा समावेश आहे. या सहकार्यामुळे एमएमआर क्षेत्रात हवामान बदलाविरुद्धच्या लढाईत आणखी बळ मिळणार आहे. राहण्यासाठी सुखकर वातावरणाची निर्मिती तसेच चक्रीय अर्थव्यवस्थेचे उद्दीष्ट्य गाठण्यासही या सहकार्यामुळे मदत मिळणार आहे. या सहकार्याचा फायदा दोघांना होणार आहे. सेवा क्षेत्रासंदर्भातील माहिती, संधी आणि कार्यक्रमांच्या विषयी माहितीच्या आदानप्रदानातून हा फायदा होईल.

यामुळे एमएमआरडीए आणि नेदरलँड सरकार यांच्यातील भागीदारीमुळे एमएमआर क्षेत्राचे उज्ज्वल भविष्य घडविण्यास मदत होईल.

महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री एकनाथ शिंदे यांनी यानिमित्ताने बोलताना म्हटले की, मुंबई महानगर प्रदेश संपूर्ण महाराष्ट्रातील प्रगतीचा स्तर दाखवणारा प्रदेश आहे. आमचा ठाम विश्वास आहे की एमएमआर क्षेत्र आणि आसपासच्या परिसरात जी अशक्यप्राय आव्हाने आहेत त्यांना सामोरे जात त्यावर तोडगा काढू. यातून आमची संपूर्ण राज्याचा शाश्वत विकास करण्यासाठी सक्षमता दिसून येईल. नेदरलँडसोबतच्या सहकार्यामुळे कचऱ्याचे व्यवस्थापन आणि वातावरण बदलाशी निगडीत अनेक समस्यांना सामोरे जाण्यासाठीची आमची सिद्धता या सहकार्यामुळे आणखी बळकट होईल असा मला ठाम विश्वास आहे. या सहकार्यामुळे एमएमआर क्षेत्राचा उत्तम विकास करणे शक्य होईल याची मला खात्री आहे.

डॉ संजय मुखर्जी, भाप्रसे, महानगर आयुक्त, एमएमआरडीए यांनी यानिमित्ताने बोलताना म्हटले की, **एमएमआर क्षेत्राचा शाश्वत विकास करणे हे एमएमआरडीएचे स्वप्न असून त्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. एमएमआर क्षेत्राचा शाश्वत नागरी विकास करणे हा आमचा दृढ संकल्प असून हा सहकार्य करार त्याच दृष्टीने उचललेले पाऊल आहे. एमएमआर क्षेत्राच्या उज्वल भविष्यासाठी चक्रीय अर्थव्यवस्था आणि पर्यावरण पूरक प्रयत्नांची गरज आहे. यामुळे कचरा व्यवस्थापनासाठी जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ट पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. एकूणच काय तर हा सहकार्य करार एमएमआर क्षेत्राच्या शाश्वत विकासाच्या आमच्या प्रयत्नांना अधिक चालना देणारा ठरेल.**

मिस्टर एरविन निजसे, एंटरप्राइझ आणि इनोव्हेशनचे महासंचालक, आर्थिक व्यवहार आणि हवामान धोरण मंत्रालय, नेदरलँड सरकार यांनी म्हटले की, **जगभरातील जागरूक संस्था, संघटना शाश्वततचा अंगीकार करण्यासाठी सहकार्याचा प्रयत्न करत असतात. जगाचे पर्यावरणीय कल्याण अशा सहकार्यांवरच अवलंबून आहे. एमएमआरडीए सोबतचा सामंजस्य करार हा एमएमआर क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी एमएमआरडीएच्या प्रयत्नांना दिलेली साथ आहे. पर्यावरण पूरक आणि शाश्वत शहरी विकासाला पूरक अशा पद्धतींच्या अंमलबजावणीद्वारे हा सहकार्य करार, एमएमआर क्षेत्राच्या पर्यावरणावर दूरगामी परिणाम करणारा ठरेल अशी आम्हाला प्रामाणिक आशा आहे."**